
इतिहास

हिंदी आणि बंगाली चित्रपट सृष्टीत कुंदनलाल सायगल यांच्या कीर्तीचा सूर्य कधीच मावळणार नाही असं म्हणतात ते काही खोटं नाही. त्यांना या क्षेत्रात आणण्याचं श्रेय कोणा एका व्यक्तीला देता येणार नाही. त्यांच्या कारकीर्दीला आकार देण्यात अनेकांचा हातभार लागलाय. वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या संदर्भात अनेकांनी सायगलांच्या वाटचालीत मदत केल्याचं त्यांचा जीवनकाल बारकाईने अभ्यासला असता लक्षात येतं.

आपण सध्या न्यू थिएटर्सचा विचार करतोय. तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, १९३१च्या फेब्रुवारीत न्यू थिएटर्सची स्थापना झाली. पण त्याच्याही अगोदर म्हणजे नोव्हेंबर १९३०मध्ये बी.एन. सरकार यांनी कुंदनलाल सायगलांना हेरलं होतं. दुसऱ्या कोणाची नजर पडण्याआधीच या हिऱ्याला पैलू पाडण्याचा विचार त्यांनी केला.

गमतीची गोष्ट अशी की, त्यावेळी कुंदनलाल यांनी आपल्या कारकीर्दीचा श्रीगणेशाही केलेला नव्हता. पण बी.एन. सरकारांना त्यांच्यातला कलाकार-गायक अचूक जाणवला होता. बी.एन. सरकार यांच्या याच दूरदृष्टीमुळे भविष्यातही त्यांनी अनेक अनमोल हिरे आपल्या कंपनीशी जोडून ठेवले होते. बी.एन. सरकार यांचं निधन २८ नोव्हेंबर १९८० रोजी झालं. त्याआधी त्यांनी १९७९मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत काही आठवणी सांगितल्या होत्या. 'मिस्टर काझी नावाच्या एका वितरकाच्या मुलीच्या साखरपुड्याच्या समारंभात मी कुंदनलाल सायगल यांचं गाणं ऐकलं होतं. मला स्वतःला संगीतातलं फारसं काही कळत नाही. त्यावेळी माझ्याबरोबर नीतिन बोस, रायचंद बोराल आणि हाफीझजी होते. त्यांना सगळ्यांनाच संगीताची उत्तम जाण होती. मी त्यांच्याशी चर्चा केली आणि त्याच वेळी या तरुणाला आपल्या कंपनीत दाखल करून घेण्याचं नक्की केलं. ही गोष्ट द न्यू थिएटर्सच्या स्थापनेच्या तीन महिने आधीची आहे.'



अभिनेता जयराज, आर. सी. बोराल आणि न्यू थिएटर्सचे कॅमेरामन

(छाया: लेखकाच्या संग्रहातून)

प्रकरण:३

अभिनेता - गायक सायगलांचा खडतर प्रवास

खऱ्या हिऱ्याची पारख ही रत्नपारख्यालाच असते ही गोष्ट कुंदनलालच्या बाबतीत अगदी शंभर टक्के खरी आहे. त्यांच्या आवाजातला गोडवा आणि सुरातली आर्तता संगीतकार हरिश्चंद्र बाली आणि आर. सी. बोराल यांनी नेमकी हेरली.

□ रजनीकुमार पंड्या

आज सव्वीस वर्षांचा तरुण आपल्या कारकीर्दीची दिशा निश्चित करून केव्हाच त्या वाटेवर चालू लागलेला असतो. पण त्या काळात सव्वीसाव्या वर्षी कुंदनलाल सायगल दीशाहीन होते. याचं कारण त्यांच्यातल्या गायकाला नेमकं हेरणारं कुणी त्यांना भेटलं नव्हतं. बंगालमध्ये त्यावेळी साहित्य, कला, संगीत यांना अनन्यसाधारण महत्त्व होतं. कोणीही उठला आणि या क्षेत्रात घुसला अशी परिस्थिती नव्हती. त्यावेळी सायगल यांनी या क्षेत्रात प्रवेश करून आपली गुणवत्ताही सिद्ध केली.

आता प्रश्न उरतो तो त्या चित्रपट वितरकाच्या मुलीच्या साखरपुड्याला सायगल कसे पोहोचले? त्यांच्या भूतकाळातल्या अनेक गोष्टी आपण मागच्या लेखात वाचल्या होत्या. त्यातही कुठे या समारंभाचा उल्लेख आला नव्हता. त्यांनी कोणा संगीत शिक्षकाकडे

गाण्याची तालीम घेतल्याचंही वाचनात आलं नाही. इतकंच नाही तर सायगल यांचं शालेय शिक्षणही जेमतेम इंग्रजी चौथीपर्यंतच झालं होतं. त्यांच्या आसपास जे संगीताला पोषक आणि पूरक वातावरण होतं तेच त्यांच्यावर संगीताचे संस्कार करायला पूरक ठरलं. त्यांचे मोठे भाऊ क्षयरोगाचे रुग्ण होते. त्यामुळे सायगल यांच्या वडिलांनी आपल्या मुलाचं मन रमावं म्हणून एक पायपेटी(हार्मोनियम) आणून दिली. पण कुंदनलालना मात्र त्या पेटीला हात लावायलाही बंदी होती. तरीही कधीतरी सगळ्यांची नजर चुकवून ते पेटीवर हात साफ करत असत. जालंधरला त्यांच्या घराच्या समोरच एक गणिका रहात होती. तिच्या घरातून रात्री-अपरात्री ठुमरी किंवा तत्सम शास्त्रीय संगीताचे सूर कानावर येत असत. बालपणी आणि किशोरावस्थेत कुंदनलाल यांनी एकलव्याप्रमाणे ते सूर मनोमन आळवायला सुरुवात केली. त्यांची संगीतसाधना अशी झाली. असं म्हणतात की, गायक-कलाकार म्हणून चांगले नावारुपाला आल्यानंतर कुंदनलाल सायगल एकदा कोलकात्याच्या एका गरीब वस्तीत गेले होते. त्यावेळी कोणीतरी खोकत खोकत 'तमिश मोर मन की कौन बुझाये...' हे गीत गात असल्याचं त्यांच्या कानावर पडलं आणि कुंदनलाल धावतच त्या झोपड्यात शिरले. तिथे तीच गणिका निर्धनावस्थेत जीवन कंठत असल्याचं त्यांनी पाहिलं. पुढे तिला सायगलांनी मदत केली होती. स्वतःच्याही नकळत तिने सायगलांना संगीताची तालीम दिली होती, त्या नियमाने ती त्यांची गुरूच होती.

अर्थात, कोणतंही शास्त्रीय प्रशिक्षण न घेता किंवा पद्धतशीर रियाज न करता कुंदनलाल आपल्या मित्रमंडळींसमोर गात असत. पुढे त्यांना रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवरची घड्याळं दुरुस्तीचं काम मिळालं तेव्हा ते रेल्वे ऑफिसर्सच्या खासगी क्लबमध्ये गाऊ लागले. पण त्यामुळे त्यांना विशेष फायदा झाला नाही. नाही म्हणायला, पाच-पन्नास लोकांच्या गर्दीसमोर गाण्याइतकी त्यांची भीड नक्की चेपली गेली. लोकही त्यांना आवर्जून गाण्याचा आग्रह करू लागले. बंगालमध्ये संगीत आणि संगीताशी संबंधित लोकांना चांगला मानसन्मान होता. त्यामुळे तिथे अशा छोट्या मोठ्या पार्ट्या ही सामान्य बाब होती. गाणारे आणि गाणाऱ्यांना प्रोत्साहन देणारे या दोघांचीही वानवा नव्हती. पण त्याला फारशी सामाजिक प्रतिष्ठा नव्हती कारण यात मनोरंजनाशिवाय दुसरा कोणताही हेतू नव्हता.

> **जालंधरला त्यांच्या घराच्या समोरच एक गणिका रहात होती. तिच्या घरातून रात्री-अपरात्री ठुमरी किंवा तत्सम शास्त्रीय संगीताचे सूर कानावर येत असत.**


छाया सौजन्य: रमेश ठाकर

सायगल

न्यू थिएटर्सच्या स्थापनेच्या आधी झालेल्या अशाच एका समारंभात बी.एन. सरकार कुंदनलाल सायगलना अचानक भेटले. त्या परिचयाचं रुपांतर पुढे मैत्रीपूर्ण संबंधात झालं आणि हे संबंध जवळजवळ एक दशकभर अबाधित होते. तो करार पंधरा वर्षांचा होता हा भाग वेगळा.

सायगल यांचं चरित्र लिहिणाऱ्या राघव आर. मेनन यांच्या 'सायगलः द पिल्ग्रिम ऑफ स्वर' मध्ये या घटनेचा उल्लेख आढळतो. न्यू थिएटर्सचे जनक बी. एन. सरकार यांच्याबरोबर त्या समारंभात भेट होण्याआधीच आर.सी. बोराल त्यांना भेटले होते. सायगलांचा बी.एन. सरकारांशी परिचय करून देण्याचा विचार त्यांच्या मनात तेव्हाच आला होता. त्यावेळी बोराल त्यांचे पूर्वज पी.सी. बोराल यांच्या नावाने असलेल्या पी.सी. बोराल स्ट्रीटवरच्या आपल्या पूर्वापार विशाल घरात राहात होते. इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी या कोलकात्याच्या रेडीयो कंपनीसाठी ते काम करत होते. त्यांचा बहुतेक वेळ इथेच व्यतित व्हायचा. पण बी.एन. सरकारांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. न्यू थिएटर्सच्या आधी सरकार यांनी स्थापन केलेली इंटरनॅशनल फिल्म्स क्राफ्ट कंपनीच्या मूक चलचित्रात पडद्यासमोरच्या बॉक्समध्ये बसून पंकज मलिक यांच्याबरोबर तेही संगीताची साथ करत असत.

त्यांचे हरिश्चंद्र बाली नावाचे एक संगीतकार मित्र वरचेवर मुंबईला जा-ये करत असत. कोलकाता वास्तव्यात ते बोराल यांच्याच घरी राहात. बाली कुंदनलालना ओळखत होते. पण एक चांगला गळा लाभलेला मुलगा म्हणूनच. त्यांना अशा नव्या कलाकारांना पुढे आणण्याचा उत्साह असायचा. तेरा वर्षाच्या वयाला लता मंगेशकरला *सीधा रास्ता*मध्ये गाण्याची संधी देणारे संगीतकार हेच होते. अर्थात, फिल्मी संगीतकोशात या गोष्टीची नोंद आढळत नाही. हरिश्चंद्र बाली बोरालना आडून आडून कुंदनलालविषयी सुचवत असत, पण त्यांनी फारसा उत्साह दाखवला नव्हता. एक दिवस रायचंद बोराल दिवसभाराचं काम करून रात्री उशीरा घरी आले, तेव्हा भोजन करून सवयीने आपल्या पानाच्या गादीवर गेले. दुकानासमोर उभे असताना अंगात लांब ढगळ कुर्ता घातलेला एक तरुण अगदी खालच्या आवाजात काहीतरी बोलत होता. त्याचा तो विशिष्ट अंडरटोन बोराल यांना चमकावून गेला. त्यांच्या डोक्यात तो फिट बसला. तो मुलगा आपल्या मित्रांसह बोलत बोलत निघूनही गेला आणि बोराल मात्र त्याच्याकडे बघत राहिले. घरी आल्यावर ही गोष्ट बालींच्या कानावर घालायचं त्यांनी

ठरवलं. बाली तर आपल्या खोलीत गाढ झोपलेले होते. तोच बोराल यांची नजर जमिनीवर अंगावर चादर ओढून झोपलेल्या कोणाकडे तरी गेली. कुणी ओळखीचा असेल, बालींबरोबर आला असेल असा विचार करून बोराल आपल्या खोलीकडे निघून गेले. पण सकाळी चहाच्या टेबलावर बाली यांनी त्या अपरिचित माणसाचा बोराल यांच्याशी परिचय करून दिला तेव्हा बोराल यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. त्यांना रात्री पानाच्या ठेल्यावर दिसलेला तोच तो मुलगा होता! बालींनी बोरालना सांगितलं की आपण ज्याचा नेहमी उल्लेख करायचो तोच हा मुलगा. किरकोळ अंगाचा तो उंच मुलगा मळक्या कपड्यात होता. त्याने बोरालना हात जोडून नमस्कार केला. बोरालनी त्याला काहीतरी गाऊन दाखव म्हणून सांगितलं. त्यांनी त्याला बसायला सांगितलं, पण तो विनम्रपणे त्यांच्यासमोर उभाच होता. सकाळची वेळ होती. कोणता राग गाशील म्हणून बोराल यांनी त्या मुलाला विचारलं तेव्हा त्याने घाबरत घाबरत पण प्रामाणिकपणे सांगितलं की, 'मला रागदारीतली काहीच माहिती नाही. पण अमूक राग अमूक पद्धतीने गातात असं सांगितलंत तर नक्की गाऊन दाखवू शकेन.' बोरालना त्याचं हे बोलणं रुचलं नाही. तरीही बालींचा शब्द राखण्यासाठी त्यांनी त्याला सांगितल, 'बाबारे, तुला जे येतंय ते गाऊन दाखव.'

असो, बोराल यांचा नंतरचा अनुभव फारच अविस्मरणीय होता. कोणत्याही वाद्याच्या साथीशिवाय कुंदनलाल यांनी उभ्या उभ्याच सूर लावला आणि आसावरी रागावर आधारित कुठलं तरी भजन म्हणून दाखवलं. बोराल त्याची गाण्याची स्टाईल बघून चकितच झाले. फारसे ओठ न हलवता जणू कोणाशी बोलतोय अशा पद्धतीने तो गाणं म्हणत होता. एखाद्या उस्तादाला साजेसं नैपुण्य त्याच्या गायकीत होतं, पण त्याची त्याला स्वतःलाच जाणीव नव्हती इतक्या सहजी तो गात होता. मोठ्या गायकाचा आविर्भाव त्याच्या गायकीत नव्हता. जणू कोणी एखाद्या कविसमंलनात मधुर आवाजात काव्यगायन करतंय अशा शैलीत तो गात होता. त्यावेळी बोराल उत्साहाच्या भरात बोलून गेले TROUBADOUR ट्रोबेदोर. (११ते १३ च्या शतकात साहित्यात जे प्रणयगीतांचे गायक झाले त्यांच्यापैकी एक प्रकार. हे कवी नुसते अर्थवाही कविता गात नसत तर त्यातल्या संवेदना पकडून गात. नव्हे ते कधीच गीतं लिहीत नसत गाता गाता त्यांच्याकडून गीतरचना होत असे. मागाहून ती गीतं लिहून काढली जात असत.)

> **बरं, गायकीच्या जोरावर त्यांना काही काम मिळवून द्यायचं तर पंकज मलिकसारखे समृद्ध गायक होते. के.सी.डेंसारख्या संवेदना जागृत करणाऱ्या गायकांनी आधीच या क्षेत्रात आपलं प्रस्थ वाढवलेलं होतं.**


के. सी. डे

या तरुणाचा अर्थात कुंदनलालचा कंठ अनन्यसाधारण आहे याची बोरालना कल्पना आली. शिवाय गायनाच्या प्रशिक्षणाशिवाय ते गाण्यात इतके तरबेज होते हेही त्यांनी विचारात घेतलं. एकाही वाद्याची साथ नसतानाही कुठेही सूर इतके तिकडे न होऊ देता त्यांनी ते भजन गाऊन दाखवलं होतं. गाताना कुठे थांबून श्वास घ्यायचा हीही एक कला आहे असं बोराल यांचं मत होतं. ती कठीण कलाही कुंदनलालना अवगत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. गाणं संपलं आणि त्या खोलीत निरव शांतता पसरली. हळूहळू सगळे भानावर आले. तेवढ्यातच कुंदनलालनी पुढे होऊन बोराल यांचे चरणस्पर्श करून आशिर्वाद घेतला. जणू ते बोरालांकडे पाठबळ मागत होते.

काय करायचं ते बोरालांना सुचलंच नाही. तो काही पार्श्वगायनाचा काळ नव्हता. शिवाय दिसायला सुंदर आणि गाण्यात तरबेज असलेल्या कलाकारांचीही उणीव नव्हती. त्या बाबतीत कुंदनलाल नापास झाले होते. त्यांची सहा फूट एक इंच उंची आणि सव्वीसाव्या वर्षीच डोक्याला पडू लागलेलं टक्कल त्यांना अभिनेता बनवण्याच्या आड येणारं होतं. बरं, गायकीच्या जोरावर त्यांना काही काम मिळवून द्यायचं तर, पंकज मलिकसारखे समृद्ध गायक होते. के. सी. डेंसारख्या काळजाला हात घालणाऱ्या गायकांनी आधीच या क्षेत्रात आपलं प्रस्थ वाढवलेलं होतं. लखनौच्या मोरिस कॉलेज ऑफ म्युझिकमध्ये प्रशिक्षण घेतलेले पहाडी सन्यालसारखे पट्टीचे गायकही लोकप्रिय होते.

या दिग्गजांपुढे कुंदनलालसारख्या पोरसवदा, गायकीचं प्रशिक्षण नसलेल्या आणि दिसायला अगदी सुमार असलेल्या मुलाचा कुठे टिकाव लागणार? हाच प्रश्न त्यांना भेडसावत होता.

एकच मार्ग होता, बी.एन. सरकार यांच्याशी या मुलाचा परिचय करून देणं. पण तो सरळ मार्गाने केला असता तर कदाचित बी.एन. सरकारही त्याच्याविषयी प्रथमदर्शनी प्रतिकूल मत बनवून बसले असते. म्हणून मग त्यांनी जिथे नीतिन बोस आणि बी.एन. सरकार जाणार होते त्या फिल्म डिस्ट्रिब्युटर मिस्टर काझींच्या मुलीच्या साखरपुड्याला येऊन तिथे गाण्याचं आमंत्रण दिलं. पण त्या छोट्याशा प्रसंगाने पुढे हिंदी चित्रपटसृष्टीला एक अनमोल नजराणा बहाल केला आणि चित्रपट संगीताचा प्रवाहच बदलून टाकला. कसा? वाचा पुढच्या अंकात.

(क्रमशः) ✯